निदेश

क्र. ३६/२०२६ दिनांक : २३/०७/२०२६

विषय :- अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत महाविद्यालय/संस्थामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनस्त असलेल्या अभ्यासक्रमांच्या शिक्षकांची (ग्रंथपाल/शारीरिक शिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) वरील स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने विद्यापीठाकडून पदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निदेश-२०२६.

ज्याअर्थी, केंद्र शासनाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठ व महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांच्या सेवाशर्ती व वेतन लागू केले आहे, व विद्यापीठ अनुदान आयोगाने विनियम -२०१८ निर्गमित केले आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने दिनांक ८ मार्च, २०१९ व १० मे, २०१९ च्या शासन निर्णय क्र. misc-2018 C.R. 56/18/Uni-I व NCTE विनियम-२०१४ व २०१७ बाबत शासन निर्णय क्र. बी.एड. ४६१७/प्र.क्र. २०८(१)/मशि-२, दि. ३.१२.२०१८ नुसार मान्य केले आहे. यानुसारच यु.जी.सी. विनियम-२०१८ संबंधात विद्यापीठाने निदेश क्र. ८/२०१९, १४/२०१९, १७/२०१९ विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत, निर्गमित केले आहे आणि शिक्षण अभ्यासक्रम संबंधात NCTE विनियम-२०१४ व २०१७ साठी निदेश क्र. ११/२०२० निर्गमित केले आहे, तसेच NCTE च्या अधिनस्त असलेले अभ्यासक्र (B.Ed./M.Ed./B.P.Ed./M.P.Ed. etc.) UGC च्या निगडीत आहेत,

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त सहयोगी प्राध्यापकांना (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती म्हणून पदोन्नती देण्याबाबत सदर शासन निर्णयात तरतूद करण्यात आली आहे व या आधारावर API/PBAS ई. नुसार त्यांचे मूल्यमापन करण्याकरीता निदेश क्र. १७/२०१९ मध्ये प्रपत्रे तयार करुन प्रसिध्द करण्यात आली आहेत.

आणि

ज्याअर्थी, निदेश क्र. १८/२०१९ मध्ये दिनांक ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ७ नुसार सदर कार्यवाही विद्यापीठाला करावयाची आहे व परिच्छेद क्र ७.३. I अंतर्गत संबंधित शिक्षकांच्या पात्रतेच्या दिनांकाच्या ३ महिने पूर्वी पदोन्नती बाबत संबंधित प्राचार्यांना अर्ज सादर करावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी, महाविद्यालयांनी उपरोक्त परिच्छेद अंतर्गत महाविद्यालयाला अर्ज प्राप्त झाल्यापासून ६ महिन्याच्या आंत सदर कार्यवाही पूर्ण करावयाची आहे.

आणि

ज्याअर्थी विद्यापीठाचे विद्या परिषदेने दि. ४.१२.२०२० च्या सभेत विषय क्र. ९६ (अ) अन्वये सहयोगी प्राध्यापकांची (स्तर -१३A) प्राध्यापक (स्तर १४) म्हणुन पदोन्नती बाबत निवड समितीने केलेल्या शिफारसीला विद्यापीठाने मान्यता प्रदान करुन प्राध्यापक म्हणून मान्यतेचे पत्र देण्यात यावे, असे निर्देश दिले होते. त्यानुसार विद्यापीठाने महाविद्यालयांकडून प्रस्ताव पाठविण्यासाठी प्रपत्रे तयार केले आहे. त्यानुसार महाविद्यालयाने उपरोक्त सर्व संबंधित निदेश व प्रपत्रे लक्षात घेवून प्रस्ताव विनियमाव्दारे सादर करावे, या संबंधात कार्यपध्दती अधिष्ठाता मंडळाने दि. ६.५.२०२१ च्या सभेत विषय क्र. ३६ अन्वये, मान्य करुन व्यवस्थापन परिषदेला कायदा कलम ७५(१) (एफ) अंतर्गत मान्यतेसाठी सादर केले होते व व्यवस्थापन परिषदेने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ च्या कलम ७५(१) (एफ) अंतर्गत विनियम क्र. १०/२०२१ विहीत केले आहे परंतु यामध्ये ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या शिक्षकांचा व तत्सम पदांचा निदेश क्र. ८/२०१९ मध्ये असलेल्या तरतुंदाचा तपशीलाने अभ्यास करावा लागेल यामुळे समावेश करण्यात आला नव्हता. अधिसभेने दिनांक ११.११.२०२१ च्या सभेत विषय क्र. ९२ (११८) (a) अन्वये ग्रंथपाल/शारीरिक शिक्षकासाठी विनियमात समावेश करावा व सदर विषय संबंधित समितीला सादर करावा असे निर्देश दिले आहे,

आणि

ज्याअर्थी, सदर समितीने अभ्यास करुन उपरोक्त बाबींचा समावेश करुन तशी दुरुस्ती विनियम क्र. १०/२०२१ मध्ये करण्यात यावी अशी शिफारस केली व विद्यापीठाने निदेश क्र. ९५/२०२२ प्रसिद्ध केले होते.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ वा वेतन आयोगाचे विनियम -२०१० विहीत केले होते व त्यावर शासनाने संकीर्ण-२०११(२५/११)विशि-१, दिनांक १५ फेब्रुवारी, २०११ चा शासन निर्गमित केले होते (विद्यापीठ निदेश क्र. ४२/२०११) या नुसार जे शिक्षक प्राध्यापक (Stage-5) पदावर स्थानांतरित झाले आहे त्यांना "Professor (Academic Level -14 in terms of 7th Pay Commission)" असे मान्यता पत्र विद्यापीठाकडून सुद्धा द्यावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी, व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७.०३.२०२४ च्या सभेत विषय क्र. ३७ अन्वये असे निर्देश दिले होते की, विनियम क्र. १०/२०२१ ला दुरुस्ती करण्याऐवजी नवीन विनियम विहीत करावे व त्वरीत अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा अधिनियम -२०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निदेश निर्गमित करावे,

आणि

ज्याअर्थी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने निदेश क्र. ७३/२०२४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा अधिनियम – २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निर्गमित करण्यात आले होते त्याला व्यवस्थापन परिषदेने विषय क्र. २१२ दिनांक १३.०१.२०२५ च्या सभेत मान्य केले असुन व्यवस्थापन परिषदेने असे निर्देश दिले की सदर विषय सेवा शर्तीच्या संबंधात असल्याने विनियम ऐवजी परिनियमाव्दारे विहीत करावे.

आणि

परिनियम विहीत करण्यासाठी काही कालावधीची आवश्यकता असल्याने आणि निर्गमित केलेले निदेश क्र. ०२/२०२६ कलम १२ (८) अंर्तगत ६ महीन्याचा कालावधी संपल्याने अधिक्रमित झाले आहे. यामुळे नविन निदेश निर्गमित करावयाचे आहे.

त्याअर्थी, मी, डॉ. मिलींद बारहाते, कुलगुरु संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालील प्रमाणे निर्देश देत आहे :

(१) सदर निदेश "अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत महाविद्यालय/संस्थामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अधिनस्त असलेल्या अभ्यासक्रमांच्या शिक्षकांची (ग्रंथपाल/शारीरिकशिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) वरुन प्राध्यापक (स्तर १४) वरील स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने विद्यापीठाकडूनपदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निदेश-२०२६ " म्हणून संबोधण्यात येतील.

(२) सदर निदेश दिनांक २४.०६.२०२६ पासून अंमलात राहील.

(३) वेगळा संदर्भ नसेल तर-

अ) "शिक्षक" म्हणजे विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम २(६१) नुसार संलग्नित महाविद्यालयातील, सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३A) पदावर कार्यरत मान्यता प्राप्त नियमित शिक्षक.

ब) "महाविद्यालय" म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेले अशासकिय महाविद्यालय किंवा संस्था

(४) निवड समितीची सभा आयोजनापुर्वी महाविद्यालयाने विद्यापीठाकडून आवश्यक प्रपत्रे महाविद्यालयीन विभागाकडून किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करावीत.

(५) प्राचार्यांने १५ दिवसांत अर्जदार शिक्षक पात्र असल्यास विद्यापीठाकडे मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी/विषय तज्ञ घेण्याकरिता प्रस्ताव सादर करावा.

(६) निवड समितीची मागणी झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंत विद्यापीठाने निवड समितीवरील प्रतिनिधी/विषय तज्ञ द्यावे.

(७) कार्यवाही करतांना निदेश क्र. ८/२०१९, १४/२०१९, १७/२०१९, व ११/२०२० मधील संबंधित सर्व बाबी व तरतुदींचे पालन करण्यात यावे. शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१९ च्या परिच्छेद क्र ७.३. I व त्यावर दुरुस्ती शासन निर्णय दिनांक १० मे, २०१९ च्या परिच्छेद क्र ७.३. VI.i नुसार प्रकरण निकालात काढण्यासाठी व उशीर होऊ नये यासाठी तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

(८) निवड समिती विद्यापीठ अनुदान आयोग विनियम -२०१८ च्या परिच्छेद क्र. 5.1 VII (निदेश क्र. ८/२०१९) व शासन निर्णय दि. १० मे, २०१९ (निदेश क्र. १४/२०१९) नुसारच गठीत करण्यात यावी.

(९) संबंधित असलेले निदेश क्रमांक ८/२०१९, १४/२०१९, मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीची गणसंख्या (quorum) पूर्ण असावी. तसेच समितीच्या सभेला विहित केलेल्या विषय तज्ञांची उपस्थिती आवश्यक आहे. तसे न आढळल्यास समितीच्या शिफारसी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. याव्यतीरिक्त बैठकीत सहसंचालक (उ.शि.) किंवा त्याचा प्रतिनिधी (तज्ञ) यांची उपस्थिती अनिवार्य आहे.

(१०) निवड समितीच्या शिफारसी त्याच दिवशी मा. कुलगुरु नामीत प्रतिनिधी यांना हस्तांतरीत करण्यात याव्यात, व सदर प्रतिनिधीने ७ दिवसांच्या आंत विद्यापीठात सादर करावे.

(११) निवड समितीची सभा झाल्यानंतर ७ दिवसांच्या आंत महाविद्यालयाने प्रस्ताव विद्यापीठाला मान्यतेसाठी सादर करावा.

(१२) अनुदानित महाविद्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिनांकापासून शक्यतोवर १ महिन्याच्या आत विद्यापीठाकडून मान्यता पत्र देण्यात येईल. विनाअनुदानित महाविद्यालयांच्या प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिनांकापासून प्रस्ताव परिपूर्ण असल्यास सहयोगी प्राध्यापकाला मान्यता पत्र सदर कालावधित देण्यात येईल.

(१३) ६ व्या वेतन आयोगानुसार प्राध्यापक म्हणून स्थानांतरण झालेल्या शिक्षकांना "Professor (Academic Level -14 in terms of 7th Pay Commission)" असे पत्र देण्याकरीता महाविद्यालयाने प्रस्ताव सर्व दस्तऐवजासह (समितीची शिफारस, सेवापुस्तिका, अनुदान पदासाठी सह संचालक (उ.शि.) यांचे पत्र इत्यादीची प्रमाणित प्रत सहा. प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक पर्यंत नियुक्तीला/पदोन्नतीला मान्यता असल्याचे पत्र/दस्तऐवज याची छायांकित प्रत) विद्यापीठाला पाठवावा व सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तपासणी करुन विद्यापीठाने पात्र प्राध्यापकाला "Professor (Academic Level -14 in terms of 7th Pay Commission)" असे मान्यतेचे पत्र शक्यतोवर १ महिन्याच्या आंत द्यावे.

(१४) निदेश क्र. ०२/२०२६ दिनांक ०३.०१.२०२६ पासुन अधिक्रमित झाले आहे.

स्वा/-

दिनांक : १६/०७/२०२६

(डॉ. मिलींद बारहाते)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

निदेश

क्र. ३७/२०२६ दिनांक : २३ /०७/२०२६

विषय :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण (AICTE) अंतर्गत अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारीरिक शिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती निदेश - २०२६.

ज्याअर्थी केंद्र शासनाने सातव्या वेतन आयोगाच्या शिफारसीच्या अनुषंगाने विद्यापीठ व उपरोक्त महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षकांच्या सेवाशर्ती व वेतन लागू केले आहे, व अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने विनियम -२०१९ निर्गमित केले आहे व त्यावर महाराष्ट्र शासनाने दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णय क्र. सविआ-११११/प्र.क्र. ४४/१९/तांशि/२ नुसार मान्य केले आहे. यासंबंधात विद्यापीठाने निदेश क्र. ५०/२०१९, विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत, निर्गमित केले आहे,

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त निदेशान्वये शिक्षकांना (ग्रंथपाल/संचालक, शारीरिक शिक्षण सह) सहयोगी प्राध्यापकांना (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर पदोन्नती देण्याबाबत सदर शासन निर्णयात (निदेश क्र. ५०/२०१९) तरतूद करण्यात आली आहे. व त्यांचे कार्याचे मूल्यमापन करण्याची तरतूद विहीत करण्यात आली आहे. तसेच या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २.९ नुसार संबंधितांना स्थान निश्चितीबाबत अर्ज प्राचार्यांना सादर करावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी, विद्यापीठाचे विद्या परिषदेने दि. ४.१२.२०२० च्या सभेत विषय क्र. ९६ (अ) अन्वये सहयोगी प्राध्यापकांच्या (स्तर -१३A) प्राध्यापक (स्तर १४) पदावर पदोन्नती बाबत निवड समितीने केलेल्या शिफारसीला विद्यापीठाने मान्यता प्रदान करुन प्राध्यापक म्हणून मान्यतेचे पत्र देण्यात यावे, असे निर्देश दिले आहे.

आणि

ज्याअर्थी, AICTE च्या ६ व्या वेतन आयोगाचे विनियम -२०१० व त्यावर दिनांक २० ऑगष्ट – २०१० च्या शासन निर्णय (निदेश क्र. ६३/२०१०) व नंतर निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार जे शिक्षक प्राध्यापक पदावर स्थानांतरीत झाले आहेत त्यांना "Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)" असे पत्र विद्यापीठाकडून सुद्धा द्यावयाचे आहे.

आणि

ज्याअर्थी निदेश क्र. ५०/२०१९ च्या अनुषंगाने AICTE अंतर्गत महाविद्यालय/संस्थे मधील पात्र सहयोगी प्राध्यापकाला (संचालक शारीरिक शिक्षण/ग्रंथपाल सह) (Academic Level-13-A-1) प्राध्यापक (Academic Level-14) पदावर स्थानांतरण झाल्यावर मान्यता पत्र द्यावयाचे आहे, व त्यासाठी विनियम विहित करावे व ही बाब तातडीने लागू करावयाची असल्याने व्यवस्थापन परिषदेने दिनांक २७/०३/२०२४ च्या सभेत विषय क्र. ३७ अन्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निदेश प्रसिद्ध करावयाचे निर्देश दिले होते.

आणि

ज्याअर्थी उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने निदेश क्र. ७३/२०२४ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा अधिनियम – २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत निर्गमित करण्यात आले होते त्याला व्यवस्थापन परिषदेने विषय क्र. २१३ दिनांक १३.०१.२०२५ च्या सभेत मान्य केले असुन व्यवस्थापन परिषदेने असे निर्देश दिले की सदर विषय सेवा शर्तीच्या संबंधात असल्याने विनियम ऐवजी परिनियमाव्दारे विहीत करावे.

आणि

परिनियम विहीत करण्यासाठी काही कालावधीची आवश्यकता असल्याने आणि निर्गमित केलेले निदेश क्र. ०३/२०२६ कलम १२ (८) अंर्तगत ६ महीन्याचा कालावधी संपल्याने अधिक्रमित झाले आहे. यामुळे नविन निदेश निर्गमित करावयाचे आहे.

त्याअर्थी, मी, प्रा. (डॉ.) मिलींद बारहाते, कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम – २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे निर्देश देत आहे :-

(१) सदर निदेश "अखिल भारतीय तंत्र शिक्षण (AICTE) अंतर्गत अशासकीय अनुदानित व विना अनुदानित संलग्नीत अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय/संस्थामध्ये शिक्षकांची (ग्रंथपाल/शारिरीक शिक्षण संचालक) सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) वरुन प्राध्यापक (स्तर १४) पदावर स्थाननिश्चिती च्या अनुषंगाने पदोन्नतीचे मान्यता पत्र देण्याबाबतची कार्यपध्दती, निदेश -२०२६" म्हणून संबोधण्यात येतील.

(२) सदर निदेश दिनांक २४.०६.२०२६ पासून अंमलात राहील.

(३) वेगळा संदर्भ नसेल तर-

अ) ''शिक्षक'' म्हणजे विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम २(६१) नुसार संलग्नित महाविद्यालयातील, सहयोगी प्राध्यापक (स्तर -१३-A-1) पदावरील मान्यता प्राप्त नियमित शिक्षक

ब) ''महाविद्यालय'' म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेले AICTE अंतर्गत अनुदानित अथवा विना अनुदानित अशासकीय अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय किंवा संस्था

(४) स्थाननिश्चिती समितीची सभा आयोजनापुर्वी महाविद्यालयाने विद्यापीठाकडून आवश्यक प्रपत्रे महाविद्यालयीन विभागाकडून किंवा विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन प्राप्त करावीत.

(५) प्राचार्याने १५ दिवसांत अर्जदार शिक्षक पात्र असल्यास विद्यापीठाकडे मा. कुलगुरुंचे प्रतिनिधी/विषय तज्ञ घेण्याकरिता प्रस्ताव सादर करावा.

(६) सदर समिती करीता मागणी झाल्यानंतर १५ दिवसांच्या आंत विद्यापीठाने समितीवरील प्रतिनिधी/विषय तज्ञ द्यावे.

(७) कार्यवाही करतांना निदेश क्र. ५०/२०१९ मधील दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयात असलेल्या संबंधित सर्व बाबी व तरतुदींचे पालन करण्यात यावे.

(८) समिती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद विनियम -२०१९ व त्यावर दिनांक ११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णय (निदेश क्र. ५०/२०१९) नुसारच गठीत करण्यात यावी.

(९) संबंधित असलेल्या निदेश क्रमांक ५०/२०१९ मधील तरतुदीनुसार समितीच्या बैठकीची गणसंख्या (quorum) पूर्ण असावी. तसेच समितीच्या सभेला विहित केलेल्या विषय तज्ञांची उपस्थिती आवश्यक आहे. तसे न आढळल्यास समितीच्या शिफारसी ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. याव्यतिरिक्त अनुदानित पदासाठी बैठकीत सहसंचालक (उ. शि.) किंवा त्यांचा प्रतिनिधी (तज्ञ) ची उपस्थिती अनिवार्य आहे.

(१०) समितीच्या शिफारसी त्याच दिवशी समिती मध्ये असलेल्या मा. कुलगुरु नामीत प्रतिनिधी यांना हस्तांतरीत करण्यात याव्यात, व सदर प्रतिनिधीने ७ दिवसांच्या आंत विद्यापीठात सादर कराव्यात.

(११) अनुदानित पदासाठी महाविद्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतोवर १ महिन्याच्या आत विद्यापीठाकडून मान्यता पत्र देण्यात येईल. विनाअनुदानित पदासाठी महाविद्यालयाचे प्रस्ताव प्राप्त झाल्याचे दिनांकापासून परिपूर्ण प्रस्ताव असल्यास सहयोगी प्राध्यापकाला प्राध्यापक (Level-14) म्हणुन मान्यता पत्र सदर कालावधीत देण्यात येईल.

(१२) ६ व्या वेतन आयोगानुसार प्राध्यापक म्हणुन स्थानांतरण झालेल्या शिक्षकांना ''Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)'' असे पत्र देण्याकरीता महाविद्यालयाने प्रस्ताव सर्व दस्तऐवजासह (समितीची शिफारस, सेवापुस्तिका, अनुदान पदासाठी सह संचालक (उ.शि.) यांचे पत्र इत्यादीची प्रमाणित प्रत, सहा. प्राध्यापक ते सहयोगी प्राध्यापक पर्यंत नियुक्तीला/पदोन्नतीला मान्यता असल्याचे पत्र/दस्तऐवज याची छायांकित प्रत) विद्यापीठाला पाठवावा व सदर प्रस्ताव प्राप्त झाल्यावर तपासणी करुन विद्यापीठाने पात्र प्राध्यापकाला ''Professor (Academic Level-14 in terms of 7th Pay Commission)'' असे मान्यतेचे पत्र शक्यतोवर १ महिन्याच्या आंत द्यावे.

(१३) निदेश क्र. ०३/२०२६ दिनांक ०३.०१.२०२६ पासुन अधिक्रमित झाले आहे.

स्वा/-

दिनांक : १६/०७/२०२६

(डॉ. मिलींद बारहाते)
कुलगुरु
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ